॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रेंड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२७ वा | गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# महाराष्ट्रात उष्णतेची लाट जीवावर

## सलग दुसऱ्या दिवशी सोलापूरचा पारा ४३° पार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात एप्रिलच्या मध्यावरच उष्णतेने भीषण रूप धारण केले असून कोकणापासून विदर्भापर्यंत तापमानाचा पारा झपाट्याने वाढत आहे. सोलापूर शहरात सलग दुसऱ्या दिवशी तापमानाने ४३ अंशांचा टप्पा ओलांडला असून बुधवारी (१५ एप्रिल २०२६) ४३.३८ सेल्सिअस इतकी नोंद झाली. तर अकोल्यात यंदाच्या हंगामातील देशातील उच्चांकी ४३.८८ सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्याने उष्णतेचा कहर स्पष्ट झाला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, १६ आणि १७ एप्रिल रोजी राज्यात उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता असून नागरिकांनी विशेष सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### उष्माघाताचा धोका वाढला

उष्णतेच्या लाटेमुळे उष्माघाताचा धोका लक्षणीयरीत्या वाढला आहे. मुंबईत मागील दीड महिन्यात तब्बल ७५० उष्माघाताचे रुग्ण आढळल्याची माहिती समोर आली असून, पुण्यासह इतर शहरांमध्येही धोका वाढत आहे. यामुळे प्रशासनाने आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवत नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

### जनजीवन विस्कळीत

सोलापूरसह राज्यातील अनेक भागांत वाढत्या उष्णतेमुळे जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असून नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. कोरड्या वाऱ्यामुळे अंगाची लाहीलाही होत असून उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. बाजारपेठांमध्येही वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

### हवामान बदलाचा परिणाम

उत्तर भारतात निर्माण झालेल्या उच्च दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्रात उष्णतेची तीव्रता वाढल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या परिस्थितीचा परिणाम पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांमध्ये चिंता

वाढत्या तापमानामुळे फळबागा आणि उभ्या पिकांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः द्राक्ष, डाळिंब आणि भाजीपाला पिकांना फटका बसण्याची भीती व्यक्त होत असून शेतकरी वर्ग धास्तावला आहे. तसेच विजेची मागणीही वाढण्याची शक्यता असल्याने ऊर्जा यंत्रणेवर अतिरिक्त ताण येऊ शकतो.

**उष्णतेची लाट असलेले जिल्हे**

- अमरावती
- सांगली
- सोलापूर
- छत्रपती संभाजीनगर
- जालना
- परभणी

### नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना

- पाणी भरपूर प्या: तहान लागली नसली तरी दिवसातून ३-४ लिटर पाणी पिणे आवश्यक.
- दुपार टाळा: सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत बाहेर पडणे टाळा.
- सुरक्षात्मक उपाय: बाहेर जाताना टोपी, छत्री किंवा रुमाल वापरा.
- योग्य पोशाख: हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे वापरा.
- हलका आहार: तेलकट व मसालेदार पदार्थ टाळून फळे व पचायला हलका आहार घ्या.
- लक्षणे ओळखा: चक्कर, मळमळ, डोकेदुखी जाणवल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्या व वैद्यकीय मदत घ्या.

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांनी विशेष काळजी घ्यावी. तसेच घराबाहेर पक्षी व प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

राज्यातील उष्णतेची ही तीव्र लाट आगामी काही दिवस कायम राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. प्रशासन ॲक्शन मोडवर असले तरी नागरिकांनीही खबरदारी घेतल्यास उष्णतेच्या या संकटावर मात करणे शक्य होणार आहे.

## अखेर सोलापूर झेडपीच्या विषय समितीचे 83 सदस्य बिनविरोध



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील झेडपीच्या दोन सदस्यांच्या नाट्यमय निर्णयानंतर अखेर सोलापूर जिल्हा परिषदेच्या विषय समितीचे 83 सदस्य बिनविरोध झाले आहेत. यामध्ये शिवराज म्हेत्रे यांची शिक्षण व पंडित तानवडे यांची अर्थ समितीच्या सदस्यपदी वर्णी लागली आहे.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषदेची विशेष सभा झाली. सभेत विशेष समितीच्या सदस्य पदासाठी अर्ज घेण्यात आले. ठरल्याप्रमाणे भाजप व इत पक्षांच्या सदस्यांनी अर्ज भरले. पण यात अक्कलकोटमधील सेनेचे सदस्य शिवराज मेहत्रे व तानवडे यांचे नाव नव्हते. त्यामुळे त्यांनी बंडखोरी करीत समाजकल्याण, शिक्षण, अर्थ व बांधकाम समितीसाठी अर्ज भरला. त्यामुळे झेडपी अध्यक्ष उपाध्यक्ष व विषय समितीची निवडणूक बिनविरोध झाली असताना विषय समितीच्या सदस्यासाठी निवडणूक लढण्याची शक्यता निर्माण झाली. यामुळे ठरल्या वेळेत सभा तहकूब करण्याची नामुष्की भाजपवर आली. त्यामुळे भाषेच्या नेत्याची बालाजी सरोवर येथे बैठक झाली. या बैठकीत दोन्ही नाराज सदस्यांचे समजूत काढण्यात आली व त्यांना समिती देण्याचे ठरले. त्यामुळे या दोघांनी माघार घेतल्यामुळे अखेर निवडणूक टळली. दुपारी साडेतीन वाजता विशेष सभा होऊन निवडणूक निर्णय अधिकारी तथा सभेच्या सचिव स्मिता पाटील यांनी सर्व विषय समितीचे सदस्य बिनविरोध झाल्याचे घोषित केले.

विषय समिती सदस्य पदासाठी भाजपने शासलेल्या शिंदे शिवसेना, राष्ट्रवादी अजित पवार गटाबरोबरच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अर्जुन सिंह मोहिते पाटील यांनाही संधी दिली. पण या सदस्य गटाच्या यादीत आपले नाव नसल्याचे कळताच अक्कलकोटच्या शिंदे शिवसेना गटाचे शिवराज मेत्रे व पंडित तानवडे यांनी उमेदवारी दाखल केली. त्यामुळे निवडणूक लागण्याची शक्यता निर्माण झाली. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार व पक्षनेत्या रश्मी बागल यांनी ही बाब गभीयार्ने घेत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची चर्चा केली. त्यानंतर भाजपचे आमदार सरोवर येथे जमले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी संपर्क करून यातून मार्ग काढला असल्याचे सांगण्यात आले. पालकमंत्री गोरे यांनी तात्काळ तानवडे व मेत्रे यांना न्याय दिला. त्यामुळे निवडणूक टळली. यामुळे प्रशासनावरील ताण कमी झाला.

## उजनी धरणाच्या डाव्या कालव्यातून कुरनूर धरणात सोडले पाणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण अक्कलकोट तालुक्यासाठी वरदायिनी असलेल्या कुरनूर धरणात सध्या उजनी धरणातून सोडण्यात आलेले पाणी मिसळत आहे.

एकरुख योजनेच्या माध्यमातून येत असलेले हे पाणी सध्या हरणा नदीत खळखळते आहे.

यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वास्तविक कुरनूर धरणातून बोरी नदीद्वारे काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणावर विसर्ग सोडण्यात आला होता. धरण निम्म्यावर आले असताना येणारे उजनीचे पाणी लाखमोलाचे ठरणार आहे.

वास्तविक उजनी धरणात अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही भागांसाठी ३ टीएमसी पाणी आरक्षित आहे. वर्षातून दोन टप्प्यांमध्ये हे पाणी सोडण्याची प्रक्रिया राबविण्यात येते.

दोन वर्षांपूर्वी एकरुख उपसा सिंचन योजनेची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. यानंतर सातत्याने हे पाणी कुरनूर धरणात सोडण्यात येत आहे.

वास्तविक मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे कुरनूर धरण जवळपास दोन महिने ओव्हरफ्लो झाले होते. यानंतरही धरणात ८२२ दशलक्ष घनफूट म्हणजेच १०० टक्के पाणीसाठा शिल्लक होता.

> कुरनूर धरणावर अवलंबून असलेले शेतकरी, ३ नगरपालिका व ५२ गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी संबंधित विभागाला एकरुख योजनेच्या माध्यमातून कुरनुर धरणात पाणी सोडण्यासाठी यापूर्वीच आदेश देण्यात आले आहेत. संबंधित विभागाकडून तशी कार्यवाहीदेखील सुरू आहे. अतिवृष्टीमुळे यंदाच्या वर्षी पाणी मुबलक असले तरीही सर्वांनी जबाबदारीपूर्वक पाण्याचा काटकसरीने वापर करावा.
>
> **- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार

मात्र सद्यस्थितीत बाष्पीभवन, विविध पाणीपुरवठा योजनेतील पाणी उपसा व शेतीसाठी सुरू असलेल्या पाणी उपशामुळे धरणात ४८ टक्के म्हणजेच ३९४.५६० दशलक्ष घनफूट इतका पाणीसाठा शिल्लक आहे.

प्राप्त असलेल्या पाणीसाठ्यामुळे यंदाच्या वर्षी दुष्काळी परिस्थिती उद्भवणार नसल्याचे चित्र आहे. पण तरीही पाणी वापर प्रक्रियेचा विचार करता उजनीचे येणारे पाणी हे अक्कलकोट तालुक्यासाठी लाखमोलाचे ठरणार आहे.

### दोन पंप महिनाभर सुरू राहणार

- उजनी धरणाच्या डाव्या कालव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.
- हे पाणी कारंबा शाखा कालवामार्गे हिप्परग्यातील एकरूख तलाव-हिप्परगा पंप हाऊस ते बोरामणी पंप हाऊसमधून दर्शनाळ कालव्याद्वारे हरणा नदीतून पाणी कुरनूर धरणात येते.
- सबंधित विभागाकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार दोन पंप सुरू केले आहेत.
- हे पाणी आणखी महिनाभर सुरू ठेवण्याची शक्यता आहे.

## कुशल जैन नवे 'सीईओ', तर कुलदीप जंगम यांची पिंपरी-चिंचवडला अतिरिक्त आयुक्त पदावर बदली





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय नेतृत्वात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) कुलदीप जंगम यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी गडचिरोली येथील अहेरीचे प्रकल्प अधिकारी कुशल जैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलदीप जंगम आता पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदाची जबाबदारी सांभाळणार आहेत.

### कुलदीप जंगम: पारदर्शक प्रशासनाचा वारसा

कुलदीप जंगम यांनी आपल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात सोलापूर जिल्हा परिषदेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. विशेषतः 'अनुकंपा भरती' प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे राबवून त्यांनी प्रशासनाचा नावलौकिक वाढवला. एक शांत, संयमी आणि सर्वांना सन्मान देणारा अधिकारी म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या कामकाजात शिस्त आणि गती पाहायला मिळाली.

### नवे सीईओ कुशल जैन: मायक्रोसॉफ्ट ते आयएएस असा प्रवास

नूतन सीईओ कुशल जैन हे २०२२ बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे सोलापूर जिल्हा परिषदेला एक तरुण आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम नेतृत्व लाभले आहे.

### कुशल जैन यांच्याबद्दल काही खास गोष्टी:

UPSC यश: त्यांनी २०२१ च्या नागरी सेवा परीक्षेत संपूर्ण भारतातून ४० वा क्रमांक (AIR 40) पटकावला होता.

शिक्षण व अनुभव: माहिती तंत्रज्ञान (IT) विषयात अभियांत्रिकी पूर्ण केल्यानंतर, त्यांनी मायक्रोसॉफ्ट सारख्या जागतिक दर्जाच्या कंपनीत काम केले आहे.

प्रशासकीय अनुभव: सध्या ते गडचिरोली येथे सहाय्यक जिल्हाधिकारी आणि आयटीडीपी अहेरीचे प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

मूळ रहिवासी: ते मूळचे जबलपूर (मध्य प्रदेश) येथील आहेत. सुरुवातीला त्यांना आंध्र प्रदेश कॅडर मिळाले होते, मात्र नंतर त्यांची बदली महाराष्ट्र कॅडरमध्ये झाली.

आयटी क्षेत्रातील अनुभव आणि प्रशासकीय कामातील गती यामुळे कुशल जैन सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला नवी दिशा कशी देतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी केली पाहणी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. वारी कालावधीत येणा-या वारकरी भाविकांना अधिकच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी विविध ठिकाणची पाहणी केली

यावेळी त्यांनी वाखरी पालखी तळावर पालखी सोहळे तसेच वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती घेतली. यामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आपत्कालीन कक्ष, विद्युत व्यवस्था, शौचालय आदी बाबतची माहिती घेऊन सूचना केल्या. तसेच भक्ती सागर येथे वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेतली.वारी कालावधीत गर्दी वर नियंत्रण ठेवण्यासाठी वाखरी येथे वॉच टॉवर उभे करावेत तसेच भक्ती सागर (६५ एकर) येथे हायमास्टची संख्या वाढवावी, तसेच पायाभूत सुविधा सहज आणि सोप्या पद्धतीने भक्तांना मिळाव्यात. याबाबतच्या महत्त्वपूर्ण अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधधिक्षक डॉ. सरडे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाने,तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (65 एकर), नदीपात्र या ठिकाणी प्रशासनाकडून भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे व मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. तसेच मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी आषाढी यात्रा कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने असल्याने मंदिर समितीकडून दर्शन रांगेत विश्रांती कक्ष स्थापन करण्यात येतात तसेच दर्शन रांगेतील भाविकांचे दर्शन जलद व सुलभ व्हावे यासाठी करण्यात येणारे नियोजनाची तसेच देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली त्याचबरोबर प्रस्तावित दर्शन मंडप बाबतची माहिती त्यांनी यावेळी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व संवर्धनाचे कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, सदर कामाची पाहणी कार्तिकेयन एस. यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी वाखरी पालखी तळ, विसावा मंदिर, भक्ती सागर (65 एकर), रिद्धी सिद्धी दर्शन मंडप, दर्शन रांग, स्काय वॉक, चंद्रभागा वाळवंट, ज्ञानेश्वर दर्शन मंडप तसेच मंदिर व मंदिर परिसराची पाहणी केली.

## सोलापूरमध्ये लोडशेडिंग! सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत गावांमधील वीजपुरवठा बंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या उन्हामुळे शेतकऱ्यांना पिकांना दररोज पाणी द्यावे लागते. त्यामुळे शेतकरी शेती फिडरवरील सिंगल फेजवर कृषिपंप जोडत आहेत. त्यामुळे 'महावितरण'कडून अशा शेती फिडरवरील वीजपुरवठा सायंकाळी ६ ते रात्री ८ किंवा १० वाजेपर्यंत बंद ठेवला जात आहे.

सोलापूर शहरात सव्वादोन लाखांहून अधिक वीजग्राहक आहेत. त्यांना दरमहा सरासरी ४८ मिलियन युनिट वीज लागते. मात्र, आता हा वापर ५६ मिलियन युनिटपर्यंत (५६० लाख युनिट) पोहोचला आहे. शहरात आठवड्यातून दोनदा नळाला पिण्यासाठी पाणी येते, त्यावेळी बहुतेक ठिकाणी नळाला इलेक्ट्रिक मोटार लावली जाते. दुसरीकडे, सोलापूर ग्रामीणमध्ये सव्वानऊ लाख वीजग्राहक असून, त्यापैकी साडेसहा लाखांपर्यंत घरगुती ग्राहक आहेत. ग्रामीण भागात दररोज सरासरी १२६० मेगावॅट विजेचा वापर होत आहे, जो उन्हाळ्यापूर्वी १२०० मेगावॅटपर्यंत होता.

दरम्यान, तापमानाचा पारा ४२ अंशांवर पोहोचल्याने शेतीपंपासाठी मोठ्या प्रमाणावर वीज वापरली जात आहे. त्यामुळे शेतकरी सिंगल फेजवर कृषीपंप जोडत असल्याने त्या फिडरवरील अपेक्षित लोड वाढला आहे. या पार्श्वभूमीवर लोडशेडिंग नसले तरी त्या फीडरवरील वीजपुरवठा सायंकाळी सहा ते रात्री आठ-दहा वाजेपर्यंत बंद ठेवला जात असल्याची माहिती 'महावितरण'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

### गावांचा पाणीपुरवठा विस्कळीत

उन्हामुळे ग्रामीण भागात विजेचा वापर वाढल्याने सतत वीजपुरवठा खंडित होत आहे. गावांपासून दूर अंतरावरील विहिरींमधून पाणी गावाच्या पाणीपुरवठा करणाऱ्या जलकुंभात सोडले जाते. त्यानंतर ते पाणी आठवड्यातील ठरलेल्या दिवशी गावकऱ्यांना दिले जाते. मात्र, वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने अनेक गावांना आठवड्यातून एक-दोन वेळाच पाणी मिळत आहे.

### सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत वीजबिलात सूट

ज्या वीजग्राहकांनी 'टीओडी' स्मार्ट मीटर बसविले आहेत, त्यांना 'महावितरण'कडून प्रतियुनिट वीजबिलात सवलत दिली जाते. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत विजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे सूट दिली जात आहे. आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील तीन लाखांहून अधिक ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसविले आहेत. सध्या तीव्र उन्हात या ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर सवलत मिळत आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी नि: संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

### वात्रटिका

**ड्रग्ज झुला**

आतून पोखरली गेली तरी
वरून झुलत आहे तरुणाई...
का पुढे निघून जाण्यासाठी
तरूणाई करतेय येवढी घाई...
दारू सिगारेट झाले आता
ड्रग्ज विळख्यात अडकली...
नशामुक्त महाराष्ट्र घोषणा
ओव्हर डोसने धुडकावली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# चिंतेचे वारे

'एल निनो' घटक सक्रिय होण्याच्या शक्यतेमुळे यंदा महाराष्ट्रासह देशाच्या प्रमुख भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज, हा शेतकऱ्यांसह धोरणकर्त्यांच्याही चिंतेत भर घालणारा आहे. यंदा सरासरीच्या ९२ टक्के इतकाच पाऊस होण्याचा विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे बसलेल्या फटक्यातून बहुतांश शेतकरी अजूनही सावरलेले नाहीत; अशा काळात येणाऱ्या मान्सूनने पाठ फिरवण्याने पुन्हा नव्या संकटाला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते. उत्तर भारतातील मोठ्या भागांत, विशेषतः गंगेचा मैदानी प्रदेश आणि पठारी भागात; तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे वगळता महाराष्ट्राच्या अन्य भागांमध्येही अपुरे पाऊसमान राहील, असे हा अंदाज सांगतो. मान्सूनच्या काळात या पावसाचे वितरण कसे राहील; म्हणजेच कोणत्या काळात आणि कोणत्या भागांत किती पाऊस होईल, याबाबत पुढील महिन्यात जाहीर होणाऱ्या अंदाजात नेमके चित्र समोर येईल; मात्र शेतकरी आणि प्रशासनालाही संभाव्य संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहण्याचा इशारा या प्राथमिक अंदाजाने दिला आहे.

आजही देशातील सुमारे साठ टक्के शेती पावसावरच अवलंबून आहे. गेल्या तीन वर्षांचा विचार करता, सन २०२३मध्ये पाऊसमान कमी राहिले. सन २०२४ मध्ये जास्त पाऊस झाला आणि गेल्या वर्षी तर अतिवृष्टीने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. त्या पार्श्वभूमीवर यंदा पाऊस सरासरी गाठणार नाही, असा अंदाज आहे. जून ते सप्टेंबर या मान्सूनच्या महिन्यांत हा घटक सक्रिय होणार आहे. पाऊस वेळेत न आल्यास दुबार पेरण्यांची वेळ येऊ शकते किंवा नंतर त्याने ओढ दिल्यास वाढीच्या काळातच पिकांना त्याचा फटका बसू शकतो. परिणामी भात, ज्वारी-बाजरी, कापूस, सोयाबीन, वेगवेगळ्या डाळी आणि तेलबियांसारख्या पिकांच्या उत्पादनात घट होऊ शकते.

सध्या राज्यभरात तीव्र उन्हाळा जाणवत असून येत्या काही काळात मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेचे इशारे देण्यात आले आहेत. अशा काळात जमिनीतील ओल निघून जाते आणि जलसाठ्यांमधील पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढते. त्या पार्श्वभूमीवर पाऊसही अपुरा होणे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरणार आहे. गेल्या वर्षी राज्याच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टीने पिके हातून गेली; तसेच जमिनींचा सुपीक थरही खरवडून गेल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये आधीच शेतकरी हैराण आहेत. त्यात अपुऱ्या पावसाने आणखी काय अडचणी उभ्या राहणार, याची नवी चिंता उभी राहिली आहे. यासाठी स्वतः शेतकरी आणि प्रशासनानेही आताच योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

दुष्काळ-अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींबरोबरच मानवनिर्मित संकटांचा बळी हा शेतकरीच ठरतो, हा दैवदुर्विलास आहे. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धस्थितीमुळे सारे जग होरपळत आहे. भारतातही गॅसटंचाईबरोबरच इंधनाची संभाव्य टंचाई आणि खतांच्या तुटवड्याचे संकट भेडसावत आहे. आपल्याकडे प्रामुख्याने रशिया व चीनसह सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि संयुक्त अरब अमिरातींमधून खतांची आयात होते. 'होर्मुझ'च्या सामुद्रधुनीतील वाहतूक बंद असल्याने मध्यपूर्वेतून खतांचा पुरवठा विस्कळित झाला आहे, त्यावर तातडीने पर्याय शोधावा लागेल आणि खतांची भेसळ व काळा बाजारही रोखावा लागेल. त्याबरोबरच कमी पावसावर तग धरणाऱ्या पिकांचाही विचार करावा लागेल. उपलब्ध जलसाठ्यांचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पाण्याचा फेरवापर यासाठी धोरणे आखून त्याची कडक अंमलबजावणी करावी लागेल; तसेच ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचेही नवे तंत्रज्ञान वाजवी दरांत शेतकऱ्यांना पुरवावे लागेल.

या युद्धस्थितीमुळे आंबे, द्राक्षे यांसह मोठ्या शेतीमालाची निर्यातही रखडल्यामुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यातच खते-कीटनाशके आणि मजुरीच्या दरांत मोठी वाढ झाल्याने शेतमालाचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे; त्या तुलनेत मालाला दर मिळत नसल्याने शेती आतबट्ट्याची ठरत आहे. या मालिकेत आणखी नवे संकट शेतकरीच नव्हे, तर साऱ्या अर्थव्यवस्थेला झेपणारे नाही. गेला काही काळ नियंत्रणात असलेल्या महागाईमध्ये गेल्या महिन्यांत युद्धस्थितीने काहीशी वाढ झाली. कमी-अधिक पावसाचे निसर्गचक्र रोखता येत नसले, तरी यंत्रणा सज्ज ठेवून संकटाला सामोरे जाण्याचे नियोजन नक्कीच करता येते. सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन आपत्कालीन नियोजनाची आतापासूनच तयारी करायला हवी.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे भारतीय लोकशाहीचा डंका जगात

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ, तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुयार्सारखे लखलखायला लागले. जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली. आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो. आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते. परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली. कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे. परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद, पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले. आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते. कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे. त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही.



त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे. कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही. आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने गर्भश्रीमंत होते. आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे. कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे. त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो. परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे. याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी व विचारवंत देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. परंतु गेल्या काही वर्षात मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममागार्ने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती कमवुन देशाच्या १४० कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे. याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असेल. स्वतःला लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी. असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल. कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे. त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे. कारण बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस निसर्गाचा ह्मास होत आहे. त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळे १४ एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम! जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## महिलांसाठी 'पिंक ई-रिक्षा योजना' : रोजगार, सुरक्षितता आणि स्वावलंबनाचा नवा अध्याय

राज्य शासनाने महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'पिंक ई-रिक्षा योजना' ही केवळ एक वाहतूक सुविधा नसून महिलांच्या रोजगार, सुरक्षितता आणि स्वावलंबनाचा नवा अध्याय ठरणार आहे.

**योजनेचा उद्देश**

आजच्या काळात महिलांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवावे आणि प्रवासात सुरक्षिततेची हमी द्यावी, या तिहेरी उद्देशाने ही योजना राबविण्यात आली आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या मुलींना रोजगार मिळविण्याची संधी या योजनेतून उपलब्ध होईल.

**आर्थिक सहाय्याचे स्वरूप**

ई-रिक्षा खरेदीसाठी महिलांना केवळ २० टक्के आर्थिक भार उचलावा लागणार असून उर्वरित ८० टक्के शासन अनुदान स्वरूपात देणार आहे. याशिवाय सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांकडून ५० टक्के कर्जाची सुविधा उपलब्ध होईल. ई-रिक्षा खरेदीमध्ये सर्व करांचा (GST, नोंदणी, रोड टॅक्स) समावेश असेल. लाभार्थी महिलांना १० टक्के आर्थिक भार उचलावा लागेल.

**प्रशिक्षण व सुविधा**

योजनेत सहभागी होणाऱ्या महिलांना ई-रिक्षा चालविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर परवाना, गणवेश व ओळखपत्र देण्यात येईल. या माध्यमातून महिलांना केवळ रोजगारच नव्हे तर प्रवासात सुरक्षिततेची हमीही मिळेल.

**सामाजिक परिणाम**

'पिंक ई-रिक्षा योजना' ही महिलांच्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडविणारी ठरेल.

- महिलांना स्वावलंबनाची संधी मिळेल.
- आर्थिक परिपूर्णतेकडे वाटचाल होईल.
- प्रवासात सुरक्षिततेची भावना निर्माण होईल.
- समाजात महिलांच्या सहभागाला नवे बळ मिळेल.

**दीर्घकालीन फायदे**

या योजनेतून महिलांना पाच वर्षांच्या कालावधीत कर्जाची सुविधा मिळेल. ५० वर्षापर्यंतच्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

राज्य शासनाची ही योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. रोजगार, सुरक्षितता आणि स्वावलंबन या तिन्ही बाबींचा समन्वय साधणारी ही योजना महिलांना नवा आत्मविश्वास देईल. 'पिंक ई-रिक्षा योजना' ही केवळ एक सरकारी योजना नसून महिलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा मार्ग आहे.

**संपर्क:**

महिला आर्थिक विकास महामंडळ, सोलापूर आणि जिल्हा महिला व बालविकास कार्यालय सोलापूर.

-जिल्हा माहिती कार्यालय
सोलापूर.

## बचेरी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव संपन्न

**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** मौजे बचेरी येथे आज भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. जयंती निमित्त पिलीव जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. जयंतीनिमित्त बारामती झटका यूट्यूब चैनल चे संपादक श्रीनिवास कदम पाटील हेही उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा परिषद शाळा बचेरी तील मुलींनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भाषणे व लेखन या संदभार्तील ग्रंथ प्राध्यापक सदाशिव शिंदे यांचे वतीने सर्व ग्रामस्थांना भेट म्हणून देण्यात आले. तसेच जयंती निमित्त चंद्रकांत जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले व प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे संविधानाचा आदर केला पाहिजे असे सांगितले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी शिंदे यांच्या मागणीनुसार प्राथमिक शाळा



बचेरी साठी शाळा खोल्या मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार आहे असे सांगितले. त्याचबरोबर संपादक श्रीनिवास पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व डॉ बाबासाहेबांच्या लिखाण व संविधान मुळे अस्पृश्यता नष्ट झाली असे सांगून याचा ग्रामस्थांनी लाभ घेण्याचे आवाहन केले. प्राध्यापक सदाशिव शिंदे यांनी ग्रामस्थांना आवाहन केले की थोर व्यक्तींचे लिखाण भाषणे वाचावेत व वाचनाचा उपयोग आपल्या मुलांचा शैक्षणिक दर्जा वाढवणेसाठी करावा. याप्रसंगी पोलीस पाटील आण्णासो शिकारे, बचेरी भाजपा अध्यक्ष राम गोरड, उपसरपंच जयवंत भिसे, मा सरपंच मच्छिंद्र थिटे, भारत काटे, रोहन काटे, लहू माने, मा उपसरपंच मोहन शिकारे, अमोल काटे, उपायुक्त पशुसंवर्धन विभाग चे मा शामराव कोळेकर, विश्वजीत गोरड पत्रकार मा सरपंच मंगेश पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी शिंदे, मंगेश साठे, श्रीमती कमल काटे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष बिराभाई शिंदे, शामराव वाघमारे, बबलू काटे भजनदास वाघमारे, शिवराम ढवळे, सुनील जाधव , सौ रतन नवगण, पांडुरंग भिसे तसेच ग्रामस्थ युवक महिला शालेय विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी आभार प्रा सदाशिव शिंदे यांनी मांडले.

# अवघ्या दोन दिवसांत जबरी चोरीचा पर्दाफाश; साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पोलीस ठाण्याने जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या दोन दिवसांत उघडकीस आणत साडेनऊ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींना अटक केली आहे. यामध्ये सहा तोळ्यांची सोन्याची चैन (अंदाजे साडेचार लाख रुपये) व गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे.

दि. ११ एप्रिल २०२६ रोजी रात्री वरवडे ते व्होळे (ता. माढा) रस्त्यावर व्होळे गावाजवळील पुलाजवळ फियार्दी ऋषिकेश अर्जुन गाडे (वय २९, रा. गुंफावाडी, ता. लातूर) हे मित्रासह जात असताना तीन अनोळखी इसमांनी बिगर नंबर प्लेटच्या मोटारसायकलवर येत त्यांची गाडी आडवी लावली. ह्वआमच्यावर का थुंकला?ह्व असा बहाणा करून फियार्दी व त्याच्या मित्राला गाडीतून खाली ओढून मारहाण केली. त्यानंतर फियार्दीच्या गळ्यातील सहा तोळ्यांची सोन्याची चैन (अंदाजे साडेचार लाख रुपये) जबरदस्तीने ओढून नेली. तसेच मित्र सुनील यालाही मारहाण करून त्यांच्याकडील दोन मोबाईल असा एकूण सुमारे चार लाख पासष्ट हजार रुपयांचा ऐवज



लंपास करण्यात आला.

या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) अन्वये दि. १२ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासासाठी सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी यांच्याकडे तपास सोपविण्यात आला.

गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. या पथकाने तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान आरोपी पुणे जिल्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार शिरूर तालुक्यातील निमोणे परिसरात शोधमोहीम राबवून पिंटू उर्फ लक्ष्मण भीमा गायकवाड (वय ३०) व योगेश अनिल भोसले (वय २१) यांना ताब्यात घेण्यात आले.

सखोल चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून चोरीस गेलेली सहा तोळ्यांची सोन्याची चैन (साडेचार लाख रुपये) हस्तगत करण्यात आली. तसेच गुन्ह्यात वापरलेले अशोक लेलँड ह्वबडा दोस्तह्व वाहन (क्रमांक एमएच तेरा डी क्यू नऊ सात दोन तीन) जप्त करण्यात आले. एकूण साडेनऊ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा (करमाळा उपविभाग) व राहुल आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी, पोलीस हवालदार विलास नलावडे, संदीप गिरमकर, सुरज मुलाणी, मोहन तळेकर तसेच सायबर पोलीस ठाण्याचे हवालदार व्यंकटेश मोरे यांच्या पथकाने केली.

या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी करीत आहेत.

## सोरेगांव व वडाळा येथे 17 एप्रिल रोजी महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. 1 ची अंमलबजावणी करण्याबाबत संदभार्धीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून दिनांक 18 फेब्रुवारी 2026 ते 15 मे 2026 या कालावधीकरिताची रुपरेषा निश्चित करुन देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने उत्तर सोलापूर तालुक्यातील सोरेगांव व वडाळा मंडळ स्तरावर शुक्रवार दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत समाधान शिबिराचे आयोजन करणेत आले आहे.

तसेच या कार्यक्रमास मा. जिल्हाधिकारी, मा. अपर जिल्हाधिकारी, मा. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर मा. आमदार महोदय उपस्थित राहणार आहेत. असे तहसिलदार उत्तर सोलापूर निलेश पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. 15 एप्रिल 2026 ते दि. 29 एप्रिल 2026 (रात्री 20.00 वा. पर्यंत) या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) व 37 (3) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

## राजीव गांधी वाचनालयात महात्मा फुले यांना अभिवादन



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** राजीव गांधी सार्वजनिक वाचनालय रावगाव ता करमाळा जि.सोलापूर येथे क्रांतीसुर्य सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 199 व्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा रावगाव चे सहशिक्षक अनिल काळूखे यांचे हस्ते करण्यात आले यावेळी माजी आदर्श मुख्याध्यापक दत्तात्रय कानडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बबन पाटूळे, सहशिक्षक माधव फुदे, प्रताप राऊत, बप्पा शिंदे, दादासाहेब बुधवंत, रामदास भूजबळ यादि उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **SK BADIYODDIN** To **MOHAMMAD BADIYODDIN SHAIKH MEHBOOB** for passport issuance.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **'PRACHI AUDUMBAR SHINDE'** to **'PRACHI ABHIJIT JAGTAP.'**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त खा. प्रणिती शिंदे यांचे अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील त्यांच्या पूणार्कृती पुतळ्यास खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे तसेच जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त खासदार प्रणिती शिंदे यांनी सर्व नागरिकांना शुभेच्छा देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आयुष्यभर आचरणात आणण्याचे आवाहन केले. 'डॉ. बाबासाहेबांचे विचार केवळ जयंतीपुरते मर्यादित न ठेवता जन्मापासून शेवटपर्यंत आचरणात आणले पाहिजेत. संविधान जपण्याचा संकल्प करणे हीच खरी जयंती साजरी करण्याची पद्धत आहे,' असे त्या म्हणाल्या.

खासदार प्रणिती शिंदे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाल्या की, देशातील लोकशाही व संविधान धोक्यात आले असून सत्ताधारी भाजपकडून त्याचा वारंवार अपमान होत आहे. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली नाही; मात्र आता देशासाठी लढण्याची वेळ आली आहे. ही स्वातंत्र्याची दुसरी लढाई असून लोकशाही व संविधान टिकवण्यासाठी जात-पात, धर्म बाजूला ठेवून संघटित



संघर्ष करणे आवश्यक आहे.

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले की, संसद व विधिमंडळात ३३ टक्के महिला आरक्षणाची तरतूद असलेले महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे मंजूर झाले आहे. यापूर्वी काँग्रेस सरकारने ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के महिला आरक्षण लागू केले होते, याची त्यांनी आठवण करून दिली.

खासदार प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या की, महिला आरक्षण विधेयक काँग्रेसच्या पाठिंब्याने २०२३ मध्येच मंजूर झाले असताना सत्ताधाऱ्यांना ३० महिन्यांनंतर जाग आली असून, पाच राज्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा करण्यात येत आहे. तसेच, महिला आरक्षणाची अंमलबजावणी मतदारसंघ पुनर्रचना (डी-लिमिटेशन) शी जोडण्यावर त्यांनी आक्षेप घेतला. मतदारसंघ पुनर्रचना करण्यापूर्वी जनगणना होणे आवश्यक आहे. मात्र केंद्र सरकार असंवैधानिक पद्धतीने निर्णय घेत आहे. हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप वारंवार लोकशाही आणि संविधानाचा अपमान करतात. महत्त्वाच्या विधेयकांपूर्वी देशभर चर्चा व्हायला हवी. संवाद हीच लोकशाहीची खरी ताकद आहे; मात्र सध्याचे सरकार एकतर्फी निर्णय घेत आहे. संवादाची परंपरा नष्ट होत असून हे लोकशाही संपुष्टात येण्याचे संकेत आहेत.

जोपर्यंत बाबासाहेबांचे विचार जिवंत आहेत आणि ते जपणारे लोक व काँग्रेस पक्ष अस्तित्वात आहे, तोपर्यंत लोकशाही व संविधानावर कुठलाही आघात होऊ देणार नाही, असा निर्धार खासदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, माजी महापौर सुशिलाताई अबुटे, संजय हेमगड्डी, अरिफ शेख, नगरसेवक नरसिंह आसादे, माजी नगरसेवक प्रवीण दादा निकाळजे, शिवा बाटलीवाला, प्रा. भोजराज पवार, प्रदेश सचिव श्रीशैल रणधिरे, कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, हनुमंतू सायबोळु, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, बाबुराव म्हेत्रे, दक्षिण तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपडंला, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष अँड. मयूर खरात, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, उद्योग व वाणिज्य सेल अध्यक्ष पशुपती माशाळ, कामगार सेल अध्यक्ष सायमन गड्डू, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, रामसिंग आंबेवाले, बसवराज म्हेत्रे, राजन कामत, सिद्राम सलवदे सर, अनिल मस्के, अशोक कलशेट्टी, रुस्तुम कंपली, लखन गायकवाड, सागर उबाळे, अँड. शुभम माने, अयाज आळंद, भीमराव शिंदे, नूरअहमद नलवार, माजी महिला अध्यक्ष सुमन जाधव, हेमाताई चिंचोळकर, अँड करीमुनिसा बागवान, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, संध्या काळे, मुमताज तांबोळी, कोंडणताई काकडे, संघमित्रा चौधरी, ज्योती गायकवाड, सलिमा शेख, पूजा चव्हाण, छाया हिरवटे, चंद्रकला निजमल्लू, अनिता भालेराव, द्रोपदी शिवशरण, सचिन पवार, महेंद्र शिंदे, यल्लाप्पा बुगले, नारायण पावटे, राजेश झंपले, गंगाधर शिंदे, शंकर म्यागेरी, मोहसीन फुलारी, दशरथ सामल, अभिलाष अच्युगटला, सचिन सुरवसे, आमिर पाटील, अभेज दर्जी, दत्तात्रय गजभार, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सम्राट विचार मंचच्या वतीने महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त रक्तदान शिबीर

पेनुर (कटूसत्य वृत्त):- पेनूर ता.मोहोळ येथील सम्राट विचार मंचच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उदघाटन मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नवनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन दीप प्रज्वलन करून सामूहिक त्रिशरण पंचशील पठण करुन अभिवादन करण्यात आले.

तसेच मोहोळ पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक मा.बाजीराव पोवार साहेब यांनी



रक्तदान शिबिरास भेट देऊन मंडळाचे सामाजिक उपक्रम हे कौतुकास्पद आहेत यापुढे देखील असेच सामाजिक उपक्रम राबवावे, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

रक्तदान जीवनदान या उदात्त हेतूने समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत, रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी या शिबिराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते यंदाचे हे पाचवे वर्ष असुन यामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळते रक्तदानच्या माध्यमातून मानवतेची सेवा करण्याचा संकल्प केला आहे. रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करुन महामानवांना अभिवादन केले आहे असे आयोजक सौरभ आवारे यांनी सांगितले. यावेळी प्रगतशील बागायतदार आण्णासाहेब देशमुख, जि.प.सदस्य चरण चवरे, सरपंच सुजित आवारे, माजी ग्रा.पं.सदस्य राजेंद्र आवारे, भाजपचे प्रकाश चवरे, हरिदास सावंत, शिवाजी आवारे, राजू राजगुरू, पंकज आवचारे, तानाजी आवचारे, आनंद आवचारे, आण्णासाहेब आवारे, आण्णासाहेब सावंत, केशव पवार, लखन सोनवणे, गौरव आवारे, प्रणव आवारे, निलरत्न आवारे, साहिल सावंत, मसुदेव सावंत, सतिश आवचारे, अक्षय आवचारे, सुमित आवचारे, सुरज आवचारे, जय आवारे, यशवंत आवचारे, सुदेश आवचारे, आर्यन ओहोळ, अजय गायकवाड, समर्थ फाळके, सचिन गवळी,राम सोनवणे,काका आवारे, भाऊसाहेब आवचारे, सुहास आवचारे, महादेव आवचारे, ऋषी कांबळे, पंकज पाखरे, अक्षय कांबळे, ओम शिरसट, श्रीधर पंडित, आर्दीसह मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहोळ

प्रतिक टॉवर, पहिला मजला, गायकवाड बिल्डींग, जुन्या स्टेट बँकेजवळ, मेनरोड, मोहोळ

दुरध्वनी क्रमांक ०२१८९- २२३३६९ ई-मेल आयडी.- arcsmohol@gmail.com

जा.क्र.कक्ष-अ/निवडणूक/क-वर्ग/२संस्था/प्रामया/जाहिर प्रसिद्धि/२९४/२०२६ दिनांक :-१५/०४/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०,नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ मधील तरतुदीनुसार खालील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी तात्पुरती/प्राथमिक मतदारयादी प्रसिध्द करण्याचे कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव |
|---|---|
| ०१ | सोमसिध्द ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या डिकसळ, ता.मोहोळ जि.सोलापूर |
| ०२ | ए.व्ही.एस. महिला क्रेडीट को.ऑप सोसायटी मर्या. मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर |

**प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | तारीख |
|---|---|---|
| ०१ | निवडणूक नियम ६(३)नुसार तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख | १६/०४/२०२६ |
| ०२ | निवडणूक नियम ८(१) नुसार तात्पुरत्या मतदार यादीवर आक्षेप/दावे/ हरकती ता.सह. निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करावयाची तारीख | १६/०४/२०२६ ते २४/०४/२०२६ |
| ०३ | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास निवडणूक नियम ८(३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाची तारीख | २७/०४/२०२६ |
| ०४ | निवडणूक नियम ८(३) नुसार आक्षेप अगर दावे / हरकती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी मोहोळ यांनी घ्यावयाच्या निर्णयाची तारीख | ०५/०५/२०२६ |
| ०५ | प्रारुप मतदार यादीवर अक्षेप अगर दावे / हरकती प्राप्त झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदारयादी प्रसिदध करावयाची तारीख | ०६/०५/२०२६ |

उपरोक्त कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी मोहोळ तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ पहिला मजला, गायकवाड बिल्डींग, जुन्या स्टेट बँकेजवळ, मेनरोड, मोहोळ जिल्हा सोलापूर व संबंधीत संस्थेच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुमित कवडे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ**

# पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा जपण्याचे आवाहन- कॉ. अशोक ढवळे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राला पुरोगामी विचारांची समृद्ध परंपरा लाभलेली असून, या परंपरेतूनच सर्वसामान्य नागरिकांना संविधानिक अधिकार प्राप्त झाले आहेत, असे प्रतिपादन कॉ. अशोक ढवळे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर पिडीत, शोषित आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी संघर्ष केला, असे नाही तर त्यांनी शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांनाही प्राधान्य दिले असे त्यांनी अधोरेखित केले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त दत्तनगर येथील पक्ष कार्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



**भोंदूपणाला साधुत्वाचा मुलामा - पुरोगामी महाराष्ट्रासाठी धोकादायक**

महाराष्ट्र ही संत आणि समाजसुधारकांची भूमी असताना, आज काही भोंदू प्रवृत्तीच्या व्यक्तींना 'साधू' म्हणून गौरवले जात आहे, ही चिंताजनक बाब असल्याची टीका कॉ. ढवळे यांनी केली. अशा प्रवृत्तींमुळे पुरोगामी विचारसरणीला धक्का बसत असून, समाजाने विवेकवादी भूमिका घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना कॉ. ढवळे यांनी भारतीय समाजरचनेतील वर्ण, वर्ग आणि जात व्यवस्थेवर सखोल भाष्य केले. 'जात म्हणजे बंदिस्त केलेला वर्ग,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते, याची आठवण करून देत त्यांनी सांगितले की, जगात मूलतः दोनच वर्ग आहेत – 'आहेरे' (श्रीमंत) आणि 'नाहीरे' (गरीब). भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटूनही या दोन वर्गांमधील दरी कायम आहे, ही चिंतेची बाब आहे.

इतिहासातील सामाजिक संघर्षांची आठवण करून देताना त्यांनी सांगितले की, १९२७ साली चवदार तळे सत्याग्रह हा समतेचा निर्णायक लढा होता. त्याआधी १८६८ मध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला करून सामाजिक समतेचा संदेश दिला. डिसेंबर १९२७ मध्ये मनुस्मृतीचे दहन करण्यात आले, तर २ मार्च १९३० रोजी नाशिक येथे काळाराम मंदिर सत्याग्रह सुरू झाला, जो तब्बल साडेपाच वर्षे चालला.

१९३५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेच्या अधिकारासाठी धर्मांतर करणार असल्याची घोषणा केली आणि अखेर १९५६ मध्ये नागपूरच्या दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड. एम. एच. शेख यांनी केले, तर वक्त्यांचा परिचय कॉ. दत्ता चव्हाण यांनी करून दिला. सूत्रसंचालन अँड. अनिल वासम यांनी केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी केला. आपल्या समारोपात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आदर्श समाजनिर्मितीसाठी मार्गदर्शक असून ते प्रत्यक्ष आचरणात आणणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर, नसीमा शेख, व्यंकटेश कोंगारी, म. हनीफ सातखेड, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, रंगप्पा मरेड्डी, प्रा. अब्राहम कुमार आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे तांत्रिक संयोजन बालकृष्ण मल्याळ यांनी केले.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

## सुडोकु - 227

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | | | | | | |
| | 3 | 1 | | | 2 | 4 | | |
| | 4 | | | | | | 5 | 2 |
| 9 | 6 | | 4 | 1 | | 8 | 7 | |
| 1 | | | 7 | | 3 | 9 | 2 | |
| | | 4 | 9 | | 8 | 1 | | |
| 4 | | 6 | 1 | | 7 | 2 | 3 | |
| 7 | 5 | 3 | | | | | 9 | 1 |
| | 1 | | | | 6 | 5 | | |

# अकलूज येथे मोठ्या उत्साहात भीम जयंती साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे मोठ्या उत्साहात, विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवून, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

मंगळवार दिनांक 14 एप्रिल रोजी, सकाळी 10 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे, बुद्ध वंदना घेण्यात आली,यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, मा.आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील,उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील,नगराध्यक्ष रेश्माताई आडगळे, क्रांतिसिंह माने पाटील यांच्यासह सर्व नगरसेवक, सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्ध वंदना होताच,

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

गेले दोन तीन महिन्यांपासून अकलूज परिसरातील, मंडळांकडून भीम जयंतीची जय्यत तयारी सुरू होती. 13 एप्रिल रोजी रात्री 12 वाजता, समस्त बंधू भगिनींनी व लहान थोरानी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे उपस्थित राहून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून, अभिवादन केले.यावेळी तमाम बांधवांनी फटाक्यांची आतषबाजी केली.

गेले दोन तीन दिवस अगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त, अकलूज परिसरात,विविध प्रकारचे सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

14 एप्रिल रोजी सायंकाळी सर्व नियमांचे पालन करून, अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती. सदर मिरवणुकीत 14 रथ सहभागी झाले होते. प्रत्येक मंडळानी रथा मार्फत सामाजिक संदेश देत, जयंती साजरी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून मिरवणुकीला सुरुवात झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, जुने बसस्थानक येथून, सदुभाऊ चौक ते गांधी चौक,जुनी पोलिस चौकी पासून ,पुन्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

# १४८ वी पुण्यतिथी जल्लोषात; अन्नछत्र मंडळात हजारो भक्तांचा महाप्रसाद सोहळा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री दिगंबरा दिगंबरा.... श्रीपाद वल्लभ दिगंबरा....! श्री अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त... सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज कि... जय !, श्रीक्षेत्र अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय...च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात १४८ व्या श्रींच्या पुण्यतिथी निमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी पहाटे रथोत्सव, विधीवत पूजा, धार्मिक कार्यक्रम, पारायण, महाप्रसाद, रक्तदान, व जिम्नॅशियमचा १८ वा वर्धापन दिन, मान्यवरांच्या भेटी व सत्कार आदी कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. अन्नछत्र मंडळात शेकडो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले. न्यासाने केलेल्या नेटक्या नियोजनाने, व्यवस्थापनाने भक्तातून समाधान व्यक्त करण्यात आले असून, अन्नछत्र मंडळात भक्तीचा मळा फुलला..! देश-विदेशातून भक्तांची मांदियाळी..! स्वामी नामाने न्यासाचा परिसर दुमदुमून गेला होता. दरम्यान श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाकडून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सालाबादा प्रमाणे ह्या ही वर्षी गेल्या ७ दिवसपासून श्री स्वामी समर्थ रथोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त रथोत्सवाचा शेवट दिवस असल्याने सर्व अमोलराजे



**स्वामी भक्तातून समाधान :**

श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये आलेल्या स्वामी भक्तांना उच्चांकी तापमानामुळे अन्नछत्र मंडळात महाप्रसादाबरोबरच थंडगार मठ्ठा देण्यात आला. याबरोबरच भक्तांना उन्हाचा त्रास होऊ नये याकरिता महाप्रसादालयात एअर कुलर सिस्टीम व समोर ग्रीन नेटची सोय करण्यात आल्याने स्वामी भक्तातून समाधान व्यक्त करण्यात आले.

मित्र मंडळ व लेझीम संघ आणि स्वामीभक्तांनी रात्रो १.३० वाजता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात उपस्थित राहून, श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील पूजनानंतर नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, न्यासाचे सदस्य सौरभ मोरे यांच्या हस्ते रथाचे पूजन करुन बुधवार पेठेतील श्री स्वामी समर्थ समाधी मठाकडे पालखी मार्गावरून रथ मार्गस्थ करण्यात आले. त्यानंतर तेथील पूजनानंतर श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रथ आणण्यात आले. महाप्रसादालयात सकाळी स्वामींचे चरित्र पोती पारायण संपन्न झाले. सकाळी ११.३० वा. श्रींचे व अन्नपूर्णा, महाप्रसादाचे पूजन माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, व मनसेचे राज्य उपाध्यक्ष व संभाजी नगरचे मनसे नेते विनायक (बंटी) म्हशीलकर लोअर परेल मुंबई, डॉ प्रसाद प्रधान, ठाणे, गौरीशंकर हिरेमठ अकलूज, शिवाजीराव गीते पाटील, कळंब जि. धाराशिव यांच्यासह स्वामी भक्तांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अन्नछत्र मंडळातील नैवेद्य श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर, बुधवार पेठेतील समाधी मठात श्रींना सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते दाखविण्यात आले. यावेळी शेकडो स्वामीभक्त उपस्थित होते.

न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या मंत्र पठणाने महाआरती संपन्न झाली माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे व मनसेचे राज्य उपाध्यक्ष व संभाजी नगरचे मनसे नेते विनायक (बंटी) म्हशीलकर लोअर परेल मुंबई यांच्या हस्ते संकल्प सोडण्यात आल्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. अन्नछत्र मंडळातील परिसरातील रक्तपेढीच्या माध्यमातून न्यासाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते.

श्री स्वामी समर्थांच्या कृपा आशिवार्दाने न्यास हे भक्तांसाठी विविध विकास कामांच्या बाबतीत आघाडी घेतलेली आहे. यासह न्यासाने स्वामीभक्त व शहरवासियांच्या सोयीकरिता इन व आऊट डोअर व्यायाम शाळा उपलब्ध करुन दिलेली आहे. आजवर यास उत्स्फूर्त प्रसाद मिळाला आहे. यापैकी इनडोअर असलेल्या मातोश्री श्रीमंत कांतामती विजयसिंहराजे भोसले जिम्नॅशियम सेंटरच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री हनुमान मूतीर्चे पूजन अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

१४८ व्या श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधुन अनेक मान्यवरांनी अन्नछत्राला भेट दिल्या. अन्नछत्र मंडळात हजारो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले. स्वामी भक्तांमुळे झालेल्या गदीर्मुळे अन्नछत्र परिसर फुलून गेलेला होता. स्वामी भक्तांनी अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री शमी-विघ्नेह गणेश मंदिर, श्री तुळजाभवानी माता मंदिर, ब्रह्मांडनायक उभी स्वामींची मूर्ती, नियोजित महाप्रसादगृह इमारत, सध्याचे अद्यावत तात्पुरते महाप्रसादालय, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, कार्यरत यात्री निवास -१ , यात्रीभुवन-२ , अतिथी गृह, आऊटडोअर व इनडोअर जीम, प्रशस्त वाहनतळ, टेकडीवरील श्री समर्थ वाटिका, शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशमन, रुग्णवाहिका, आश्रयदाते कक्ष हे सर्व न्यासाने भक्तांच्या सेवेर्थ सुरु केलेल्या विविध उपक्रमांचे स्वागत करुन न्यासाचे कौतुक केले. परगावहून आलेल्या पालख्यांचे स्वागत न्यासाच्या वतीने करण्यात आले.

यាप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, रामचंद्रराव घाटगे, मनोज निकम, अप्पा हंचाटे, प्रवीण देशमुख, सनी सोनटक्के, सिद्धाराम टाके, प्रा. सायबण्णा जाधव, सिद्धेश्वर माळी, विश्वनाथ हडलगी, अतिश पवार, अभिषेक लोकापुरे, बाळासाहेब पोळ, रोहित पाटील, योगेश कटारे, रोहन शिर्के, माजी नगरसेवक-रामचंद्र समाणे, किशोर सिद्धे, संजय गोंडाळ, रोहित खोबरे, सौरभ मोरे, वैभव मोरे, कुणाल भालेकर, स्वामिनाथ बाबर, मैनुद्दीन कोरबू, प्रशांत साठे, प्रवीण घाडगे, बसवराज स्वामी, नितीन होनोळी (करकी), केदार माळशेट्टी, शुभम सावंत, विजय तथा गोटू माने, निखील पाटील, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, गोरखनाथ माळी, नामा भोसले, शहाजीबापू यादव, सतिश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, धनंजय निंबाळकर, समर्थ घाडगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, किरण साठे, सुमित घाटगे, प्रसाद मोरे, केदार तोडकर, शिवराम काजळे, विशाल कलबुर्गी, नितीन कोबन, शिवकुमार स्वामी, संभाजीराव पवार, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, तानाजी पाटील, राजू पवार, अनिल बिराजदार, किरण शिंदे, तानाजी सूर्यवंशी, जेटेप्पा मुदगी, मल्लिनाथ कोगणुरे, विलास राठोड, चंद्रकांत कुंभार, धानप्पा उमदी,चंद्रकांत हिबारे, नामदेव भोसले, कुमार सलबत्ते, पिंटू हळ्ळूरे, रमेश धोत्रे, काशिनाथ वाले, राहुल इंडे, यश विभूते, ओंकार कांबळे, आदित्य हत्ते, बसवराज स्वामी, रोहित कदम यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# वेळापूर येथे पंचाचार्य जगद्गुरूंचा अड्डपालखी मिरवणुक सोहळा संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** लक्ष लक्ष नायनांनी पंचाचार्य जगद्गुरूंचा भव्य-दिव्य अड्डपालखी मिरवणुक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींचा अमृत आणि सुवर्ण पट्टाभिषेक महोत्सवानिमित्त ऐतिहासिक धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल चार दिवस सुरू आहे.

रविवारी पंचाचार्य जगद्गुरूंची भव्य-दिव्य अड्डपालखी मिरवणुक सोहळा पालखी मैदान ते श्री बृहन्मठ पर्यंत भव्य असा सोहळा निघाला.लेझीम महिलांचे ढोलीबाजा पथक विविध धार्मिक वाद्य कलश धारक महिला घोड्यावर सत्कारमूर्ती श्री गुरु मुक्तेश्वर शिवाचार्य महाराज व श्री सद्गुरु सदाशिव शिवाचार्य महाराज आरुड झाले होते. त्यानंतर श्री रंभापुरी जगद्गुरु, श्री उज्जैन जगद्गुरु, श्री शैल्य जगगुरु,श्री काशी जगद्गुरु, डॉक्टर मल्लिकार्जुनश्री काशी जगद्गुरु यांची अड्डपालखी तर सोहळ्यासाठी उपस्थित शिवाचार्य गण यांची रथातून मिरवणूक काढण्यात आली तर नंतर रेणुकाचार्य यांचा सजवलेला रथ व अनेक भक्तगण मिरवणुकीत सहभागी झाले.

या सोहळ्यासाठी हजारो भक्तगण गेले तीन दिवस उपस्थित आहेत.मिरवणुकीनंतर हिंदू वीरशैव लिंगायत समाज पंचाचार्य जगद्गुरू यांचे दिव्य सानिध्यात व अनेक शिवाचार्य यांच्या उपस्थितीत धर्मसभा संपन्न होऊन प्रसादाचे वाटप करण्यात आले. सोमवारी मुख्य कार्यक्रम होणार आहे पंचाचार्य जगदुरूंच्या दिव्यसानिध्यात श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री.ष.ब्र. १०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांना हरिद्रलेपन व अभ्यंग स्नान संपन्न होवून सकाळी १०.३० वाजता पंचाचार्य जगगुरु तसेच, उपस्थित शिवाचार्य, संत-महंत, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मसभा संपन्न झाली आणि नंतर उपस्थितांसाठी महाप्रसाद वाटप करण्यात आले.

# श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी निमित्त श्री वटवृक्ष देवस्थानच्या वतीने पालखी सोहळा संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** दत्त अवतारी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने श्रींचा पालखी सोहळा मिरवणूक मोठ्या उत्साहाने व भक्ती भावाने संपन्न झाला. दिवसभर पुण्यतिथी महोत्सवाचे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाल्या नंतर सायंकाळी साडे पाच वाजता मंदिरातून पालखी मिरवणुकीस मोठ्या भक्तीभावाने व अपार श्रद्धेने प्रारंभ झाला. प्रारंभी देवस्थानचे पुरोहित मंदार महाराज पुजारी यांचे हस्ते श्रींची आरती झाली. यानंतर वटवृक्ष मंदिर समितीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे भोसले राजासाहेब, सोलापूर जिल्हा पोलीस अधिक्षक अतुलचंद्र कुलकर्णी, नागपूरचे उद्योजक राणा सुर्यवंशी या मान्यवरांच्या हस्ते



पालखी पूजन होऊन प्रस्थान झाले. पालखी सोहळ्यामध्ये टाळ मृदूंगाचा गजर, सुश्राव्य बँड पथक, दिंडी, व स्वामी नामाचा गजर, तसेच ढाकणी, चिकुर्डा, खामसवाडी, उदतपूर, तावशी, उस्मानाबाद, येथून आलेल्या वारकरी दिंडया, ढोल पथक, नयनरम्य फटाक्यांची आतषबाजी यामुळे पालखी सोहळा रंगला होता. शहरातील चौका चौकात भाविकांनी रांगोळीच्या पायघड्या व पुष्पवर्षाव, फटाक्यांची आतिषबाजीने पालखी सोहळ्याचे स्वागत केले. या निमीत्ताने संपूर्ण मंदिरास नयनरम्य अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पालखी सोहळ्याचे चौकाचौकात भाविकांनी रांगोळी व गुलाबपुष्पांच्या उधळणासह स्वागत करून दर्शन घेतले. फत्तेसिंह चौक, समर्थ चौक, सावरकर चौक, कारंजा चौक मार्गे समाधी मठाकडे पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाले समाधी मठात पालखीचे पूजन, भजन होऊन कारंजा चौकमार्गे सुभाष गल्ली, भारत गल्ली, देशमुख गल्ली मार्गे वटवृक्ष मंदिरात पालखी विसावली. वटवृक्ष मंदिरात भजन, विडा, चौरी, आरती होऊन शिरा प्रसाद वाटपाने पालखी सोहळ्याची सांगता झाली.

आज स्वामी पुण्यतिथी निमित्त आ.सचिन दादा कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मा. आमदार सिद्धाराम म्हेत्रे आदीसह विविध मान्यवरांनी श्रींचे दर्शन घेतले. श्री स्वामी पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून स्वामीभक्त अक्कलकोट नगरीत दाखल झाले होते, त्यामुळे अक्कलकोट शहरातील रस्ते गर्दीमुळे फुलून गेले होते.

यावेळी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, प्रथमेश इंगळे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, प्रदीप झपके, विजय दास, नगरसेवक अविनाश मडीखांबे, महेश हिंडोळे, खाजप्पा झंपले, श्रीशैल गवंडी, प्रसन्न हत्ते, नागनाथ जेऊरे, प्रमोद हिंडोळे, राजेश नीलवणी, व्यंकट मोरे, अमर पाटील, रामचंद्र समाणे, शिवानंद स्वामी, प्रदीप हिंडोळे, पिंटू साठे, चंद्रकांत सोनटक्के, दीपक जरीपटके, प्रा.शिवशरण अचलेर, संजय बडवे, शीवा जमगे, बाळासाहेब एकबोटे, दर्शन घाटगे, रमेश शिंदे सर, प्रसाद पाटील सर, अमर पाटील, अंजय फुटाणे, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, संजय पाठक, गिरीश पवार, शशिकांत लिंबीतोटे, श्रीनाथ महामूरे, अक्षय सरदेशमुख, काशिनाथ गुरव, ज्ञानेश्वर भोसले, संतोष जमगे, मंगेश फुटाणे, स्वामीनाथ लोणारी, संतोष पराणे, संजय पवार, प्रसाद सोनार, मोहन जाधव, प्रसाद पाटील, नितीन शिंदे, गणेश दिवाणजी, किरण किरात, योगेश पवार, संजय बडवे, रवी मलवे, महेश मस्कले, चंद्रकांत गवंडी, गोकुळ गवंडी, सुनील गवंडी, आदीत्य गवंडी, सुनिल पवार, बंडेराव घाटगे, लक्ष्मण घंटे, स्वामीराव मोरे, अशोक घंटे, प्रशांत गुरव, ज्योती जरीपटके, सुवर्णा जाधव इत्यादींसह देवस्थानचे व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कर्मचारी व सेवेकरी आदींसह शहरातील व परगावाचे अनेक स्वामी भक्त या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

# टीबी मुक्त भारत अभियानाला बळ 15 क्षयरुग्णांना पोषण आहार किट वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात १०० दिवसीय प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान टप्पा-२ दिनांक २४ मार्च २०२६ पासून सुरू झाले आहे .त्यानिमित्ताने लोकसहभागाद्वारे सामाजिक उत्तरदायित्व जपत "सोलापूर प्राईव्हेट हॉस्पिटल ओनर्स असोसिएशन" या संस्थेने शहर क्षयरोग केंद्राकडील 15 क्षयरुग्णांना सहा महिन्याकरीता पोषण आहार किट वाटप केले

या किटमध्ये मटकी एक किलो, हिरवा मूग एक किलो ,सोयाबीन वडी एक किलो ,शेंगादाणे एक किलो, गुळ एक किलो, हिरवा वाटाणा 100 ग्राम, चणा 100 ग्रॅम ,खजूर ५०० ग्रॅम इत्यादीचा समावेश आहे.

समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, दानशूर व्यक्ती ,स्वयंसेवी संस्था, कार्पोरेट संस्था, लोकप्रतिनिधी, समाजसेवक यांनी सोलापूर हॉस्पिटल ओनर्स असोसिएशन या संस्थेप्रमाणे निक्षय मित्र बनून क्षयरुग्णांना पोषक आहारासाठी सहाय्य करावे असे आवाहन प्रमुख पाहुणे डॉ. राजाभाऊ येवले( नवी दिल्ली) डॉ. आनंद श्रीधरन (नवी दिल्ली) ,शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरूंधती हराळकर यांनी केले. सदर कार्यक्रमात सोलापूर प्राईव्हेट हॉस्पिटल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय मंठाळे, सचिव डॉ. निशिकांत मस्के ,सदस्य डॉ. प्रकाश घाटोळे ,डॉ.ज्योती चिडगुपकर आणि एनटीईपी कर्मचारी उपस्थित होते.

# सोलापुरात पाणी निचरा ते कचरा व्यवस्थापन - आयुक्त ओंबासे यांचा आढावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील नागरी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि नागरिकांना होणाऱ्या अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेच्या विविध कामांची आयुक्त सचिन ओंबासे यांनी पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.



नाना-नानी पार्क परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर उपाययोजना म्हणून पार्कमधून सोमपा परिवहन विभागालगत असलेल्या नाल्यात पाणी सोडण्यासाठी मिनी कॅनल (कालवा) तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून पार्कसमोरील साचलेले पाणी थेट नाल्यात सोडले जाणार असून उद्यानात पाणी साचून लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास टाळण्यावर भर देण्यात आला आहे. यावेळी पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल आणि सुरक्षेच्या दृष्टीनेही आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच लगतच्या टेनिस कोर्टची पाहणी केली .

पार्कमधील आकांक्षी शौचालयाचीही पाहणी करून पाण्याची कमतरता भासू नये यासाठी स्वतंत्र बोअरवेल उभारण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. त्यानंतर आयुक्तांनी इंद्रधनु सोसायटी परिसरातील कचरा ट्रान्सफर प्रकल्पाची पाहणी केली. यापूर्वी देगाव, दमानी नगर, थोबडे वस्ती व परिसरातील कचरा उघड्या रॅम्पवरून छोट्या वाहनांमधून मोठ्या आरसी गाडीत टाकताना कचरा उडून परिसरात पसरण्याची समस्या निर्माण होत होती.

या पार्श्वभूमीवर आता त्या ठिकाणी संरक्षित मोठा हॉल उभारण्यात आला असून त्यामुळे कचरा इतरत्र न पसरता योग्य पद्धतीने संकलित व वाहतूक करता येणार आहे. या कामाबाबतही आयुक्तांनी समाधान व्यक्त करत पुढील आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

याच अनुषंगाने तुळजापूर रोड येथील बायो एनर्जी प्लांटचीही आयुक्तांनी पाहणी केली. या प्लांटमध्ये कचऱ्याचा पुर्नवापर करून ऊर्जा निर्मिती केली जात असली तरी उर्वरित कचऱ्याचे ढीग बाहेर मोठ्या प्रमाणात साचत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हा कचरा इतरत्र न पसरता त्याची योग्य विल्हेवाट लावावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच कचरा डेपो परिसरातील रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्याचेही निर्देश देण्यात आले.

या पाहणी दौऱ्यावेळी सहायक आयुक्त शशिकांत भोसले,मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे, विभागीय अधिकारी राघवेंद्र गायधनकर, कनिष्ठ अभियंता लायका मनगोळी, चेतन प्रचंडे, उद्यान अधीक्षक कोमल काशिद, प्र. उद्यान अधीक्षक स्वप्नील सोलंकर, उद्यान सुपरवायझर सुहास शिंदे, सहाय्यक निरीक्षक दारफळे, मुख्य आरोग्य निरीक्षक नल्ला बंधू यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यानिमित्त शाळेत अखंड वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य महादेव चोपडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून नूतन नगरसेवक बालाजी भडकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचे महत्त्व समजावून सांगितले.

जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून कार्यक्रमाला रंगत आणली.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, कला विभाग प्रमुख रमेश चव्हाण, विज्ञान विभाग प्रमुख गोरख गायकवाड यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव पवार यांनी केले, तर सोमनाथ ढोले यांनी आभार प्रदर्शन केले.

# नगरसेवक किसन जाधव यांच्याकडून पालकमंत्री गोरे यांना संविधानाची प्रतिमा भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पार्क चौक येथील त्यांच्या पूणार्कृती पुतळ्यास अभिवादन करून सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजपाचे नगरसेवक किसन जाधव यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांना भारतीय संविधानाची प्रतिमा भेट देत आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन केले. या वेळी अक्कलकोटचे पाणीदार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, सोलापूर शहर मध्यचे युवा आमदार देवेंद्र दादा कोठे, महापौर विनायक दादा कोंड्याल, भाजपा शहराध्यक्षा रोहिणीताई तडवळकर, भाजपा नेते शहाजी पवार, नगरसेवक गणेश वानकर, स्वीकृत नगरसेवक मनीष केत, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, संजय भंडगे, संतोष ऋतिक गायकवाड, माणिक कांबळे, महादेव राठोड, यल्लाप्पा शिवपुरीआदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री नामदार जयकुमार भाऊ गोरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे भारतीय लोकशाहीचे भक्कम अधिष्ठान आहे.

समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित असलेले संविधान प्रत्येक नागरिकाला न्याय देण्याचे काम करते. संविधानाचा आदर राखणे आणि त्याच्या तत्वांचे पालन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संविधानाची प्रतिमा भेट देण्यामागील उद्देश म्हणजे समाजात संविधानाबद्दल जागृती निर्माण करणे हा आहे. आजच्या पिढीने संविधानातील मूल्ये जाणून घेत त्यानुसार आचरण करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.